किंमत रुपये - ३००/-

# महाराष्ट्र शासन

## उप वनसंरक्षक आलापल्ली वनविभागआलापल्ली यांचे कार्यालय

## सन 2017-2018 या वर्षात विभागीयरित्या कुपातील शिल्लक जळावू बिटे, लांब बांबु व बांबु बंडल्स वाहतुकीचे ई- निविदा

1) निविदा धारकाचे संपूर्ण नांव -

2) पुर्ण पत्ता -

3) आयकर विभागाचे पॅनकार्ड क्रमांक -

4) ट्रक क्रमांक -

5) निविदाधारकासाठी ठरविण्यात आलेल्या अटी व शर्ती मंजूर असून जळावू बिटे, लांब बांबु व बांबु बंडल्स वाहतुकीकरिता नमुद केलेल्या प्रत्यक्ष अंतरासाठी आणि विक्री डेपोवरील मोजमापासाठी विहीत मुदतीत करारनाम्याप्रमाणे जळावू बिटे, लांब बांबु व बांबु बंडल्स वाहतूक बिना नुकसानी करुन देईन.

सहपत्र :- 1. पॅनकार्डची छायांकीत प्रत
2. ट्रक रजिस्ट्रेशनची छायांकीत कागदपत्रे
3. विहित प्रपत्रात प्रतिज्ञापत्र

दिनांक :- स्वाक्षरी :-

निविदाधारकाचे नांव -

# प्रतिज्ञापत्र

दिनांक :

प्रति,

उपवनसंरक्षक,
आलापल्ली वनविभाग,
आलापल्ली

विषय :- सन 2017-18 वर्षात आलापल्ली वनविभागातील विभागीयरित्या कुपातील शिल्लक वनोपजाचे वाहतूकीचे ई-निविदाबाबत.

ooo

सन 2017-2018 या वर्षात आलापल्ली वनविभागातील विभागीयरित्या कुपातील शिल्लक वनोपजाचे वाहतुकीचे ई-निविदाचे संबंधात मी...................................... ................................ रा. ......................... ता. .......................... जिल्हा ...................... असे प्रतिज्ञापत्र दाखल करतो की, माझेवर नैतिक अध:पतनाचा संबंध असणाऱ्या कोणत्याही गुन्हयाबाबत न्यायालयात गुन्हा सिध्द झाला नाही तसेच अशा प्रकारच्या कोणत्याही गुन्हयाबाबत तक्रार न्यायालयात दाखल नाही तसेच शासनाची देणी देण्याबाबत मी कोणतेही कसूर केली नाही किंवा माझे नांव काळ्या यादीत समाविष्ट करण्यांत आलेले नाही व या अगोदर मला वरील कारणास्तव केव्हाही अपात्र घोषीत करण्यांत आलेले नाही. तसेच वाहतुक निविदेतील अटी व शर्ती मला मान्य असुन मी त्यानुसार कामे करण्यास तयार आहे.

सही -

निविदाधारकाचे नांव -

संपूर्ण पत्ता -

दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक -

महाराष्ट्र शासन

उपवनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली

## ई–निवीदा सुचना

आलापल्ली वनविभागातील सन 2017-18 मध्ये विभागीयरित्या कुपातील शिल्लक जळावू बिट, लांब बांबु व बांबु बंडल्स कुप डेपो ते विक्री डेपो पर्यंत वाहतुक करण्यास प्रती बिट, प्रती बांबु व प्रती बांबु बंडल्स प्रमाणे इच्छुक वाहतुकदारांकडून ई–निविदा मागविण्यात येत आहे.

### वाहतुक करावयाचे जळावू बिट, लांब बांबु व बांबु बंडल्सचे तपशील

| अ. क्र. | वाहतुक करावयाचे वनोपजाचा तपशिल | वनोपजाची अंदाजीत मात्रा |
|---|---|---|
| 1. | विभागियरित्या कुपातील शिल्लक जळावू बिट (धण्मी) | 2214.00 |
| 2. | विभागियरित्या कुपातील उत्पादीत/शिल्लक लांब बांबु (नग) | 1562460 |
| 3. | विभागियरित्या कुपातील उत्पादीत/शिल्लक बांबु बंडल्स (नग) | 157396 |

1) विस्तृत माहिती ई- निविदा फार्म मध्ये संकेतस्थळावर उपलब्ध राहील.
2) ई - निविदाचे फार्मची किंमत रुपये 300/- (नापरतावा) व अनामत रुपये 15000/- Online पध्दतीने भरणा करावी.
3) ई-निविदाचे फार्म, शर्ती व अटी www.Mahatenders.gov.in तसेच mahaforest.nic.in या संकेतस्थळावर दिनांक 05/ **02/2018** रोजी उपलब्ध होईल.
4) ई-निविदा दिनांक **14/02/2018** वेळ सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत अपलोड करता येईल.
5) ई-निविदा दिनांक **16/02/2018** वेळ सायंकाळी 5.00 वाजता उपवनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांचे कार्यालयातील सभागृहात उघडण्यांत येईल.

उपवनसंरक्षक,
आलापल्ली वनविभाग, आलापल्ली

d:\desktop back up d drive\desktop back up d drive\desktop\general file\e tender 2015-16\e tender 2017-18\2017-18 tr.e- tender.docx8

## उप वनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांचे कार्यालय
### ट्रकव्दारे जळावू बीटे, लांब बांबु व बांबु बंडल्स वाहतुकीबाबत
### ई-निविदा सुचना

1. सन 2017-2018 मध्ये आलापल्ली वन विभागातील विभागीयरित्या कुपातील शिल्लक असलेले सोबतच्या ई-निवीदा प्रपत्रातील जळावु बिट, लांब बांबु व बांबु बंडल्स कुप डेपो ते विक्री डेपो पर्यंत वाहतुक करणारे ईच्छूक वाहतुकदाराकडून कुप डेपो ते विक्री डेपो पर्यंतच्या अंतराकरिता जळावु बिटा करिता प्रति बिट, लांब बांबु करीता प्रति बांबु व बांबु बंडल्स करीता प्रति बंडल्स प्रमाणे दिनांक **14/02/ 2018** ला सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत ई-निविदा मागविण्यात येत आहे. ई-निविदा www.Mahatenders.gov.in तसेच mahaforest.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. ई-निविदा दिनांक **16/02/2018** रोजी सायंकाळी 5.00 वाजता उघडण्यात येईल. वाहतुक करावयाच्या मालाचे तपशिल ,मात्रा व कुप डेपो पासुन ते विक्री डेपो पर्यंत अंतर ई-निविदा प्रपत्रात दर्शविण्यात आलेले आहे.

**2. अ) सदर ई-निविदा भरण्याकरिता आवेदकाची आवश्यक पात्रता खालील प्रमाणे आहे.**

1. ज्याचे नावाने किंवा कुटूंबाचे नावाने कमीत कमी 5 (पाच) ट्रक असेल त्यांचीच ई-निविदा ग्राहय धरण्यात येईल. ई-निविदा धारकांनी त्यांच्या नावाचे किंवा कुटूंबाचे ट्रकच्या रजिस्ट्रेशनची साक्षांकीत केलेली प्रत ई-निविदा सोबत अपलोड करणे बंधनकारक आहे.
2. ई-निविदा धारकाने आयकर विभागाचे पॅनकार्डची साक्षांकित प्रत अपलोड करणे आवश्यक आहे.

**1. यापुढे नमुद व्यक्ति किंवा फर्म ई-निविदा भरण्यास पात्र ठरणार नाही :-**

नैतिक अध:पतनाचा संबंध असणा-या कोणत्याही गुन्हयाबाबत न्यायालयात गुन्हा सिध्द झाला असेल अशा कोणत्याही गुन्हयाबाबत न्यायालयाने जाहीर केलेली व्यक्ति किंवा शासनाची देणी देण्याबाबत ज्याने कसुर केली असेल अशी व्यक्ती किंवा ज्याचे नाव काळ्या यादीत आहे अशी व्यक्ति किंवा फर्म.

**ब) सदर ई-निविदा सोबत ईच्छुक आवेदकांनी खालील प्रमाणे कागदपत्रे जोडावी.**

1. ई-निविदा फॉर्म, प्रतिज्ञापत्र, अटी व शर्ती सुचना, पॅनकार्डची छायांकीत प्रत, ट्रक रजीस्ट्रेशनची कागदपत्रे.
2. ई-निविदा फॉर्मची किंमत रु. 300/- (अक्षरी रुपये तीनशे) व अनामत रक्कम म्हणून रुपये 15000/- (अक्षरी रुपये पंधरा हजार) Online द्वारे भरणा करावी.
3. जळावू बिट, लांब बांबु व बांबु बंडल्स वाहतुकीकरिता वापरण्यात येणाऱ्या निविदाधारकाचे स्वत:चे मालकीची किंवा कुटूंबाची मालकी असलेल्या ट्रक संबंधीची माहिती (ट्रक क्रमांक) निविदामध्ये नमुद करावी व संबंधीत वाहनाचे रजिस्ट्रेशन कागदपत्राची छायांकीत प्रत स्वाक्षांकीत केलेली ई-निविदासोबत अपलोड करावी.

**क) ई-निविदा भरतांना खालील बाबी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.**

1. ई-निविदा पत्रात वाहतुकीचे दर जळावू बिट प्रति बिट, लांब बांबु प्रति बांबु व बांबु बंडल्स प्रति बंडल कुपनिहाय नमुद करावे. सदर दर भराई व उतराई सहीत एकत्र नमुद करावे.
2. उपरोक्त कुपातील आगारापर्यंतचे अंतर व मालाचा तपशिल अंदाजित असून विक्री आगारावर घेण्यात आलेल्या प्रत्यक्ष मोजमापासाठी दर लागु राहतील. प्रत्यक्ष अंतर किंवा मालाचे परिमाण कमी जास्त झाल्यास नुकसान भरपाई देण्यांत येणार नाही.
3. वनोपज (जळावू बिटे/लांब बांबु व बांबु बंडल्स ) वाहतुकीचे अंतर व रस्त्याचा प्रकार यांची मौक्यावर खात्री करुनच निविदा भरण्यात यावी. यावर नंतर कुठलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

4. ई-निविदा दिनांक **14/02 /2018** ला दुपारी 5.00 वाजेपर्यंत अपलोड करता येईल. तसेच ई-निविदा दिनांक **16/02/2018** रोजी सायंकाळी 5.00 वाजता उघडण्यात येईल व मंजूरीबाबत निविदा धारकास उपवनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांचे कार्यालयाकडून सूचित करण्यांत येईल.
5. निविदा मंजूर झाल्यानंतर संबंधित निविदा धारकाने 3 (तिन) दिवसाचे आंत या वन विभागाकडे करारनामा करुन द्यावा लागेल. करारनामा केल्या नंतर वन विभागाकडुन कार्यारंभ आदेश प्राप्त होताच 3 दिवसाचे आंत ट्रक पाठवुन निविदा मंजुर झालेल्या मालाची वाहतुक सुरु करुन 30 दिवसाचे आत कोणत्याही परिस्थितीत पुर्ण करणे बंधनकारक राहील. वाहतुकीची प्रगती विचारात घेवुन मुदतवाढ देतो किंवा नाकारता येईल. मुदत वाढीनंतर दिलेल्या मुदतीत वाहतूक न केल्यास करारनामा आपोआप रद्द होईल व निविदा धारकाची अमानत रक्कम सरकार जमा करण्यात आणि मालाची वाहतुक स्थानिकरित्या मंजुर निविदा दरावर करण्यात येईल व त्यावर कोणत्याही प्रकारची निविदा धारकाची तक्रार किंवा दावा ऐकल्या जाणार नाही किंवा ग्राहय धरल्या जाणार नाही.
6. यशस्वी निविदाधारकास प्रथम जळावू बिटाची/ लांब बांबु/ बांबु बंडल्स संपूर्ण वाहतुक मुदतीत पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र संबंधीत वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडुन प्राप्त झाल्याशिवाय अमानत रक्कम या वन विभागाकडून परत करण्यांत येणार नाही.
7. उपरोक्त ई-निविदात दर्शविलेले कुप ते विक्री आगारापर्यंतचे अंतर अंदाजे असुन निविदाधारकाने निविदा भरतांना प्रत्यक्ष रस्त्याची व कुप डेपो ते विक्री डेपो पर्यंत अंतराची खात्री करुनच निविदा भरावी. एकदा निविदा भरण्यांत आल्यानंतर अंतराबाबत तसेच रस्त्याबाबत निविदाधारकाची कोणतीही तक्रार नंतर ऐकल्या जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.
8. एका निविदा धारकास मालाचे आकारमान (मात्रा) लक्षात घेवून किती कुपाचे काम द्यावे हे ठरविण्याचा अधिकार उप वनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांना राहील.
9. कोणतेही कारण न दाखविता निविदा अंशत: किंवा पुर्णत: नामंजूर करण्याचा तसेच अटीत बदल करण्याचा अधिकार उपवनसंरक्षक आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांनी राखून ठेवलेला आहे. तसेच वाहतूक संबंधात काही वाद निर्माण झाल्यास मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) गडचिरोली यांचा निर्णय अंतिम राहील.

ड) निविदा मंजूर करण्याचे मापदंड खालील प्रमाणे आहे.

1. निविदा मंजूर करतांना कुपनिहाय न्युनतम दराच्या निविदा विचारात घेतल्या जातील.
2. एकापेक्षा जास्त निविदाधारकांनी जर एकाच ठिकाणच्या वाहतूकीसाठी सारख्याच न्युनतम दर निविदात नमुद केले तर अशा वेळी लॉट टाकून (ईश्वर चिठ्ठी) निविदा मंजूर करण्यात येईल.
3. निविदामध्ये अंकात व अक्षरात नमुद केलेल्या दरात फरक आढळल्यास यापैकी न्युनतम रक्कमेचे निविदा दर ग्राहय मानण्यांत येईल.

उपवनसंरक्षक
आलापल्ली वनविभाग आलापल्ली

उपरोक्त सुचना वाचून निविदा भरण्यांत येत आहे

स्वाक्षरी

निविदा धारकाचे नांव

d:\desktop back up d drive\desktop back up d drive\desktop\general file\e tender 2015-16\e tender 2017-18\2017-18 tr.e- tender.docx4

महाराष्ट्र शासन

उपवनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली

विभागीयरित्या कुपातील शिल्लक जळावू बिटे, लांब बांबु व बांबु बंडल्स वाहतुक करणेबाबतच्या अटी व शर्ती

**विभागीयरित्या कुपातील शिल्लक जळावू बिटे, लांब बांबु व बांबु बंडल्स वाहतुकीकरिता ई-निविदा मागविण्यात येत असुन सदरच्या ई-निविदा दिनांक : 14/02 /2018 ला सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर अपलोड करता येईल.**

1. ई-निविदा फॉर्मची किंमत रुपये 300/- व अनामत रक्कम 15000/- online पध्दतीने भरणा करावी.
2. ई-निविदातील दर पुर्ण अंतरासाठी अंकात व अक्षरात जळाऊ बिटासाठी प्रती बिट, लांब बांबुसाठी प्रति बांबु व बांबु बंडलसाठी प्रति बंडल्स कुप निहाय नमुद करणे अनिवार्य आहे. प्रती किलोमिटर प्रती जळाऊ बिट/बांबु /बंडल्स दराची निविदा नाकारण्यात येईल. **निविदा फॉर्ममध्ये खोडतोड झाल्यास तारखेनिशी स्वाक्षरी करावी . तसेच ई-निविदा फॉर्मचे प्रत्येक पानावर स्वाक्षरी करणे बंधनकारक आहे.**
3. उपरोक्त ई-निविदेत दर्शविलेले कुप ते विक्री डेपो पर्यंतचे अंतर अंदाजे असुन निविदाधारकाने ई-निविदा भरतांना प्रत्यक्ष रस्त्याची व कुप डेपो ते विक्री डेपो पर्यंतचे अंतराची खात्री करुनच ई-निविदा भरावी. एकदा ई-निविदा भरण्यांत आल्यानंतर अंतराबाबत तसेच रस्त्याबाबत निविदाधारकाची कोणतीही तक्रार ऐकल्या जाणार नाही.
4. **एका निविदा धारकास वाहतुकीची मात्रा व त्यांचेकडे उपलब्ध ट्रक लक्षात घेवून किती कुपाचे काम द्यावे हे ठरविण्याचा अधिकार उप वनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांना राहील.**
5. वनविभागातर्फे कुपातील उत्पादित मालाचे वाहतुकीकरिता कार्यारंभ आदेश प्राप्त होताच 3 (तिन) दिवसाचे आंत वाहतुक सुरु करणे अनिवार्य आहे. सदर कालावधीत जळावू बिट, लांब बांबु व बांबु बंडल्स वाहतुक सुरु न केल्यास करारनामा रद्द करण्यात येईल व त्यावर कोणत्याही प्रकारची निविदाधारकांची तक्रार किंवा दावा ऐकल्या जाणार नाही किंवा ग्राहय धरल्या जाणार नाही.
6. दिलेल्या मुदतीत काम सुरु न केल्यास किंवा विक्री आगारावर वाहतुक पूर्ण न झाल्यास पूर्व सुचना/नोटीस न देता निविदा रद्द करण्यात येतील व पर्यायी व्यवस्था करुन मालाची वाहतुक निविदाधारकांचे जोखीम व जबाबदारीवर पूर्ण करण्यात येईल.
7. करारनामा प्रमाणे वाहतुक कंत्राटदार हे वनोपजाची वाहतुक करण्यास असमर्थ असल्याचे उप वनसंरक्षक यांचे निदर्शनास आल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता कोणत्याही वेळी मंजुर दरा प्रमाणे वनोपजाची वाहतुक दुस-या वाहतुकदाराकडुन करुन घेण्यात येईल व या बाबत निवीदा मंजुर धारकाची कुठलीही उजर/तक्रार ऐकल्या जाणार नाही व यास स्वत: सर्वस्वी जबाबदार राहतील.
8. निविदाधारकांने करारनामा करतांना वाहतुकीच्या रक्कमेच्या 10 टक्के रक्कम अनामत रक्कम म्हणून उपवनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली (Dy.Conservator of Forests Allapalli Division Allapalli) यांचे नांवाने बँक ऑफ महाराष्ट्र, अहेरी शाखेवर रोख होणारा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) द्वारे जमा करण्यात यावे.
9. कोणतेही कारण न दाखविता निविदा अंशत: किंवा पूर्णत: नामंजूर करण्याचा तसेच अटीत बदल करण्याचा अधिकार उप वनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांनी राखून टेवलेला आहे. तसेच वाहतुकी संबंधात काही वाद निर्माण झाल्यास मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), गडचिरोली यांचा निर्णय अंतिम राहील.

10. निविदाधारकांचे मालकीचे कमीत कमी 5 (पाच) ट्रक असणे अनिवार्य आहे. वनोपज वाहतुक कामावरील ट्रक चालक, वाहक व मजुरांचे शोधन व त्या अनुषंगाने इतर संविधिक देयतांची जबाबदारी निविदाधारकाची राहील व उपवनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली अशा जबाबदारीपासून मुक्त राहतील.

11. वाहतुकीकरिता ठरवून देण्यात आलेल्या मुदतीच्या आत आगारावर वाहतुक न झाल्यास ठोस कारणमिमांसा देवून मुदत वाढीककरिता उपवनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांचेकडे अर्ज सादर करता येईल. मुदत वाढीनंतर दिलेल्या मुदतीत वाहतूक न केल्यास कराररनामा आपोआप रद्द होईल व निविदा धारकाची अमानत रक्कम सरकार जमा करण्यात येईल आणि मालाची वाहतुक स्थानिकरित्या मंजुर निविदा दरावर करण्यात येईल व त्यावर कोणत्याही प्रकारची निविदा धारकाची तक्रार किंवा दावा ऐकल्या जाणार नाही किंवा ग्राहय धरल्या जाणार नाही. मुदतवाढीकरिता त्यावेळची परिस्थिती व त्यांनी केलेल्या वाहतुकीची प्रगती विचारात घेवून मुदतवाढ देणे किंवा नाकारणेचे अधिकार उपवनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांनी राखून ठेवलेले आहेत.

12. वाहतुक केलेले जळावू बिट /लांब बांबु / बांबु बंडल्स आगारावरील प्रचलित पध्दतीनुसार केलेले प्रत्यक्ष मोजमाप अंतीम समजण्यात येईल. याबाबत वाहतूक निविदरधारकाची कोणतीही तक्रार ग्राहय धरण्यात/समजण्यांत येणार नाही.

13. कुप डेपोवरुन विक्री डेपो पर्यंत जळावू बिट/लांब बांबु/ बांबु बंडल्स वाहतुक करतांना जान/मालाचे नुकसान झाल्यास तसेच संबंधीत विक्री आगारावर माल कमी प्राप्त झाल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी वाहतूक निविदा धारकांची राहील आणि नुकसानाची रक्कम संबंधीत निविदाधारकाकडून वसुल करण्यांत येईल.

14. वाहतूक निविदाधारकांनी जेवढया जळावू बिट /लांब बांबु व बांबु बंडल्सची मात्रा वाहतूकीकरिता निविदा मंजूर करण्यात आली तेवढी वनोपजाची मात्रा विहीत मुदतीत वाहतूक करण्यास हयगय केल्याचे आढळून आल्यास या वनविभागाकडून पर्यायी व्यवस्था अंमलात आणण्यांत येईल त्यामुळे वनविभागास होणारे संभाव्य नुकसानीस संबंधीत वाहतूक निविदाधारक वैयक्तिकरित्या व वारसानासह जबाबदार राहतील व त्यांचेकडून नुकसान भरपाई वसूल केली जाईल.

15. वाहतूकीचे निविदा दर मंजूरीचे आदेश पारीत झाल्यापासून 3 (तिन) दिवसाचे आंत यशस्वी निविदाधारकास उपवनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांचेशी वाहतूकी संबंधी रुपये 100/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करावा लागेल. सात दिवसानंतर वाढीव फी रुपये 50/- प्रती दिवस प्रमाणे भरावे लागेल. करारनामा करतेवेळी एकुण वाहतुकीच्या रकमेच्या 10 टक्के रक्कम धनाकर्ष स्वरुपात सुरक्षा ठेव म्हणून जमा करावी लागेल. सदर सुरक्षा ठेव मध्ये अमानत रक्कम रुपये 15000/- एवढी समायोजीत करण्यांत येईल.

16. जळावू बिट/लांब बांबु व बांबु बंडल्स वाहतूक संबंधात संबंधीत रस्ता नादुरुस्तीचे कारण ग्राहय मानले जाणार नाही. वनोपजाचे वाहतूकीस दिलेल्या कालावधीत कोणत्याही परिस्थितीत वाहतूक करण्याची संपूर्ण जबाबदारी वाहतूक निविदाधारकाची राहील. ई-निविदा भरण्यापूर्वी वाहतूक निविदाधारकांनी रस्ता व नमुद केलेले रस्त्याचे अंतर लक्षात घेवून ई-निविदा अपलोड करावे. यासंबंधात वनविभाग कोणतीही जबाबदारी स्विकारणार नाही.

17. वाहतूक करावयाचे जळावू बिट, लांब बांबु व बांबु बंडल्स संख्या अंदाजीत असून कोणत्याही वेळी परिमाणात (मात्रेत) बदल करण्याचे अधिकार उप वनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली हे राखून ठेवीत आहेत.

18. वाहतूक केलेला वनोपज (जळावू बिट/ लांब बांबु व बांबु बंडल्स) विक्री आगारात सुर्योदयापासुन ते सुर्यास्तापर्यंत चे कालावधीत स्विकृत केला जाईल. वाहन सोबत कुप डेपोतून जारी करण्यात आलेला चालान (ज्यावर वाहतूक होत असलेले वनोपजाचे सविस्तर तपशिल) असणे आवश्यक आहे. चालानशिवाय वनोपज विक्री आगारावर स्विकृत केला जाणार नाही.

19. कुप डेपोमध्ये दर्शविलेला माल अंदाजे असून त्यापेक्षा कमी किंवा जास्त वनोपज राहु शकतो. वाढलेल्या वनोपजाची वाहतूक निविदातील मंजुर दरानुसारच करणे निविदाधारकास बंधनकारक राहील. तसेच करार कालावधीत घडलेल्या कोणतेही नैसर्गिक आपदाकरिता वनविभाग जबाबदार राहणार नाही.

20. वाहतुकीचे कार्यरंभ आदेश प्राप्त होताच वनोपज वाहतूकीचे काम 3 (तिन) दिवसात सुरु करावे लागेल.

21. करारनामा केलेल्या वनोपजाचे (जळावू बिट/ लांब बांबु व बांबु बंडल्स) वाहतुकीकरिता निविदाधारकांनी पुरेसे ट्रक (निविदेत नमुद केलेली संख्या) न लावल्यास वनोपजाचे वाहतूकीसाठी वनविभागाकडून पर्यायी व्यवस्था केल्यास निविदाधारकांची तक्रार ऐकल्या जाणार नाही किंवा तक्रार ग्राहय धरण्यांत येणार नाही व ई-निविदेत नमुद केलेले पुरेसे वाहने उपलब्ध करुन न दिल्यास करारनामा रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार उपवनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांना राहतील.

22. कुपातील वनोपजाचे निष्कासन शासनाने एखादया वेगळ्या अभिकरणाव्दारे करण्याचे आदेश दिल्यास सदर जळावू बिट/लांब बांबु व बांबु बंडल्स वाहतुकीचा करारनामा रद्द करण्याचे अधिकार उप वनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांचेकडे राहतील व त्यावर कोणत्याही प्रकारची निविदाधारकाची तक्रार किंवा दावा ऐकल्या जाणार नाही किंवा ग्राहय धरल्या जाणार नाही.

23. निविदा स्विकृत झाल्यानंतर कोणतेही कारण न दाखविता, कोणतेही वेळेस निविदा रद्द करण्याचे अधिकार उपवनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांचेकडे राहतील व त्यावर कोणत्याही प्रकारची निविदाधारकाची तक्रार किंवा दावा ऐकल्या जाणार नाही किंवा ग्राहय धरल्या जाणार नाही.

24. सहकारी संस्था/ सुशिक्षीत बेरोजगार सहकारी संस्थानी ई-निविदा भरतांना सुरक्षा ठेव व अनामत रक्कम पूर्ण भरणे अनिवार्य राहील.

25. वाहतुकीचे निविदा मंजुर झाल्यानंतर जे निविदाधारक अटी व शर्ती नुसार विहित मुदतीत 10 टक्के सुरक्षा ठेव जमा करुन करारनामा करणार नाही, अशा वाहतुक कंत्राटदाराचे अनामत रक्कम सरकार जमा करण्यात येउन त्यांचे नाव काळया यादीत (Black List) टाकण्यात येईल.

उपवनसंरक्षक
आलापल्ली वनविभाग आलापल्ली

<u>उपरोक्त अटी व शर्ती मान्य आहे.</u>

स्वाक्षरी

निविदा धारकाचे नांव -